# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१४४ दिनांक - १६/०४/२०२४

**नालासोपारा प्रगती नगर शिवसम्राट बिल्डींग येथे एक महीला व एक पुरुष बांग्लादेशी नागरीक यांचेवर कारवाई करुन आरोपी यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश**

तुळींज पोलीस ठाण्याचे हद्दीत शिवसम्राट बिल्डींग,प्रगती नगर नालासोपारा पूर्व ता-वसई जि.पालघर याठिकाणी परकीय नागरीक अनधिकृत पणे भारतात राहत असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाली असता सदर वेळी दोन लायक पंच यांना कार्यालयात बोलावुन घेवुन सदर परकीय नागरीकांवर प्रगती नगर येथे जावुन कारवाई करण्याच्या सुचना देवून सदर बातमीची खातरजमा करुन पंच व पोलीस पथक असे जावून दि.१५/०४/२०२४ रोजी कारवाई करुन शिवसम्राट बिल्डींग, प्रगती नगर,नालासोपारा पूर्व येथील अनधिकृतपणे राहत असलेले बांग्लादेशी नागरीक एक महीला व एक पुरुष यांना अटक करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आलेले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी कि, शिवसम्राट बिल्डींग नं.०२, प्रगती नगर नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर परीसरामध्ये अनधिकृतपणे वास्तव्य करीत असलेले परदेशी नागरीक यांच्या मिळालेल्या माहीतीच्या आधारे शिवसम्राट बिल्डींग नं.०२ च्या गेट च्या बाहेर जावुन तेथे सशंयीत एक महीला व एक पुरुष मिळुन आल्याने त्यांना पोलीसांनी त्यांची ओळख करुन देवुन सदर पुरुष व महीलेस त्यांचा नाव ,पत्ता व भारतीय नागरीकत्वाची कागदपत्रे विचारले असता विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) आकाश आरीफ खान वय २६ वर्षे रा. शिवसम्राट बिल्डींग नं.२, रुम नं.०३ प्रगती नगर नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर,मुळ देश- बांग्लादेश (पुर्ण पत्ता माहीत नाही ) मो.नं.७२८३८४३९४०, तसेच महीला नामे २) लाबोनी पोरीधीन मंडल वय २२ वर्षे रा. शिवसम्राट बिल्डींग नं.२, रुम नं.०३ प्रगती नगर, नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर, मूळ देश बांग्लादेश (पुर्ण पत्ता माहीत नाही) मो.नं. ९२७२०४४४९३ असे सांगितले असून त्यांचेकडे त्यांचे भारतात येण्याकरीता व्हिझा पासपोर्ट नसून ते अनधिकृत पणे भारतात प्रवेश करुन येवुन अवैधरित्या वास्तव करीत असल्याने सदर महीला व पुरुष बांग्लादेशी आरोपी यांचेवर तुळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं.३०६/२०२४ भारतीय पासपोर्ट अधिनियम १९२० चे कलम ३(अ),६(अ),सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाल यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व सफौ/९५०३३ पवार, पोहवा/०५०२८ किणी, पोहवा/०७०५५ शेटये, पोहवा/१०००२ किणी, मपोहवा/०५००४ डोईफोडे, मपोहवा/०८००३ तिवले चालक पोहवा/०७०६६ पागी, सर्व नेम.अनै.मा.वा.प्र.कक्ष नालासोपारा विभाग यांनी केली आहे.